Government of Maharashtra

MAGNETIC
MAHARASHTRA
CONVERGENCE 2018
Global Investors Summit - Feb 18-20

# महाराष्ट्र काथ्या धोरण

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
उद्योग विभाग

Government of Maharashtra

# महाराष्ट्र काथ्या धोरण –2018

## 1. प्रस्तावना

नारळाच्या सोडणापासून काथ्या व काथ्यावर आधारित उद्योगाची वाढ सागरी किनारा लाभलेल्या देशातील इतर राज्यामध्ये मोठया प्रमाणात होत असून, सदर उद्योग कृषीआधारित, कुटिरउद्योग असून हा रोजगारक्षम व निर्यातभिमुख उद्योग आहे. नारळाच्या सोडणापासून (सोलल्यानंतर) काथ्या व कोको पीथ मिळते व काथ्यापासून विविध प्रकारची उपयुक्त उत्पादने घेण्यात येतात. नारळ उत्पादक राज्यातील ग्रामीण क्षेत्रामध्ये आर्थिक व सामाजिक विकासामध्ये काथ्या उद्योगाची महत्त्वाचा सहभाग असून, या क्षेत्रामध्ये विशेषत: महिलांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत आहे. महाराष्ट्र राज्यास मोठा सागरी किनारा लाभलेला असून सद्य:स्थितीत कोकण विभागामध्ये 22750 हेक्टर क्षेत्रफळावर नारळाचे उत्पादन घेण्यात येत असून त्यामध्ये दरवर्षी वाढ होत आहे. राज्यात इतर राज्याच्या तुलनेत काथ्या उद्योगाचा विकास नगण्य असून, मोठया प्रमाणावर कच्चा मालाच्या उपलब्धतेमुळे काथ्या उद्योगाच्या वाढीस मोठया प्रमाणावर वाव आहे.

विविध नाविन्यपूर्ण पुढाकार घेऊन राज्यातील औद्योगिक वातावरण अधिक पोषक होण्यासाठी व जागतिक स्पर्धात्मकतेसाठी उद्योगाची वाढ होण्यासाठी राज्याने औद्योगिक धोरण 2013 घोषित केलेले आहे. राज्याच्या औद्योगिक वाढीच्या मुख्य प्रवाहात या क्षेत्रातील उद्योजकांच्या सक्रिय सहभागाने ग्रामीण भागात सर्वसमावेशक आर्थिक विकास होण्यासाठी समर्पित धोरण निश्चित करण्याचा शासनाचा मानस आहे.

## 2. काथ्या उद्योगापुढील आव्हाने:

काथ्यावर आधारित उद्योग प्रामुख्याने या क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तांत्रिक कौशल्य व उद्योजकता विकास हा काथ्यावर आधारित उद्योग वाढीसाठी महत्वाचा घटक आहे. कॉयर प्लायवूड्चा वापर फार कमी प्रमाणात बांधकाम व फर्निचर क्षेत्रामध्ये होत आहे. यामध्ये अधिक अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध होणे आवश्यक आहे. काथ्या उद्योग कृषी आधारित महिला रोजगारक्षम कुटिरउद्योग असल्याने, काथ्या उद्योगाशी संबंधित कारागिरांची/उद्योजकांची सामाजिक–आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी या उद्योगास बँका व वित्तीय संस्थांकडून कमी व्याजदराने पतपुरवठा होणे आवश्यक आहे. सध्या उपलब्ध असलेल्या नारळाच्या सोडणापैकी देशामध्ये केवळ 22% नारळाची सोडणी काथ्या उद्योगात वापरली जात असल्यामुळे नैसर्गिक उपलब्ध कच्च्या मालाचा वापर वाढविण्यास मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे.

## 3. महाराष्ट्रातील काथ्या उद्योगाची सद्य:स्थिती:

महाराष्ट्रास सुमारे 720 किमी लांबीचा सागरी किनारा लाभला आहे. नारळाचे उत्पादन मुख्यत्वे: कोकण विभागातील सिंधुदूर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असून, राज्यातील इतर भागात देखील नारळाचे उत्पादन घेण्यात येते. सर्वसाधारणपणे वार्षिक 52,000 मे.टन नारळाची सोडणे उपलब्ध असून, नारळांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होवूनसुध्दा काथ्या व काथ्यावर आधारित मूल्यवर्धित उत्पादने उत्पादित केली जात नाहीत. सद्य:स्थितीमध्ये राज्यामध्ये काथ्या तयार करणारे व काथ्यावर प्रक्रिया करणारे फक्त 27 उद्योग कार्यरत आहेत. राज्यामध्ये उपलब्ध सोडणाच्या 1% सोडणाचा वापर काथ्या उद्योगासाठी केला जातो, हे प्रमाण राष्ट्रीय सरासरी प्रमाणाच्या नगण्य आहे.

## 4. उद्देश

A. कोकण विभागामध्ये उद्योगाच्या, रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करुन ग्रामीण उद्योजकता वाढविणे.

B. काथ्यावर आधारित मुल्यवर्धित उत्पादनांच्या माध्यमातून महिला उद्योजकता विकास व सबलीकरण करणे.

C. भारतामध्ये समतोल शाश्वत विकास व पर्यावरणपूरक काथ्याच्या उत्पादनांच्या वापरास प्रोत्साहित करणे.

D. राज्यातील काथ्या उद्योगाचा जलद व समतोल विकास करण्यासाठी उबवण, संशोधन आणि विकास केंद्राची स्थापना करणे.

E. स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत काथ्या व काथ्यावर आधारित उत्पादनांसाठी बाजारपेठ विकसित करणे.

F. राज्यातील नारळाच्या सोडणाचा जास्तीत जास्त वापर करुन नारळाच्या लागवडीस प्रोत्साहन देणे.

G. नागरी क्षेत्रात शहाळ्याच्या सोडणावर प्रक्रिया करुन पर्यावरणाचे संवर्धन करणे

## 5. उद्दिष्ट

A. राज्यामध्ये पुढील पाच वर्षात काथ्या उद्योगामध्ये 50,000 रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

B. पुढील पाच वर्षात काथ्या व काथ्यावर आधारित उत्पादने तयार करण्यासाठी नारळाच्या सोडणाचा विनियोग 1% वरुन 50% पर्यंत वाढविणे.

C. राज्याच्या कोकण विभागामध्ये काथ्यावर आधारित नवीन 8000 सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची स्थापना करणे.

D. काथ्या उद्योगाच्या क्षमता वाढीसाठी किमान 5 सामायिक सुविधा केंद्राची स्थापना करणे.

E. महाकॉयर (महाराष्ट्र काथ्या उत्पादन, प्रशिक्षण आणि प्रदर्शन केंद्र), कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथे उबवन व संशोधन विकास केंद्र स्थापन करणे.

## 6. धोरणात्मक उपाय

राज्यामध्ये काथ्या व काथ्यावर आधारित उद्योगाच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य काथ्या धोरण 2018 खालील उपाय सुचवित आहे.

A. कच्च्या मालाची उपलब्धता वाढविणे

B. विशेष प्रोत्साहन योजना

C. स्पर्धात्मकता वाढविणे

D. काथ्या क्षेत्रातील कौशल्य आणि उद्योजकता विकास

E. बाजारपेठ विकसन व विपणनासाठी सहाय्य पुरविणे

### काथ्या उद्योग धोरणाची ठळक वैशिष्टये

राज्यामध्ये विशेषत: सागरी किनारा लाभलेल्या जिल्हयामध्ये काथ्या व काथ्यावर आधारित उद्योगाचा विकास करण्यासाठी काथ्या उद्योग धोरणाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

- **धोरणाची व्याप्ती**

  सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम 2006 अंतर्गत उत्पादनासाठी उद्योग आधार ज्ञापन (UM²) धारण करणारे व अस्तित्वात असलेल्या सामुहिक प्रोत्साहन योजना मधील पात्र उपक्रम प्रस्तुत धोरणातील विशेष प्रोत्साहन योजनेसाठी पात्र असतील.

- **सामुहिक प्रोत्साहन योजना अंतर्गत अतिरिक्त सवलती**

  काथ्या उद्योगासाठी अ व ब विभागातील उद्योगासाठी क विभागातील सवलती अनुज्ञेय राहतील. क व ड विभागातील उद्योगासाठी ड+ विभागातील सवलती अनुज्ञेय राहतील. तसेच ड+ व विना उद्योग जिल्हा विभागातील उद्योगांसाठी नक्षल प्रभावित विभागातील सवलती अनुज्ञेय राहतील.

Government of Maharashtra

- **विशेष भांडवली अनुदान**

  नवीन किंवा विस्तारीत पात्र सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना तालुका वर्गीकरणानुसार स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या 30 ते 35 टक्के दराने रु 50 लाख मर्यादेपर्यंत भांडवली अनुदान अनुज्ञेय राहील. प्रस्तुत भांडवली अनुदान उद्योग घटकाचे उत्पादन सुरु झाल्यापासून 5 समान वार्षिक हप्त्यांमध्ये वितरीत करण्यात येईल.

| अ. क्र. | सा.प्रो.यो. 2013 नुसार तालुक्यांचे वर्गीकरण | भांडवली अनुदान (स्थिर भांडवल गुंतवणूकीच्या %) | विशेष भांडवली अनुदान कमाल मर्यादा (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| 1. | A & B | 30 | 20 |
| 2. | C | 35 | 30 |
| 3. | D | 35 | 40 |
| 4. | D+ | 35 | 50 |
| 5. | द्योग नसलेले जिल्हे व नक्षल प्रभावीत विभाग | 35 | 50 |

केंद्रशासन, राज्यशासन तसेच त्यांचे उपक्रम यांचेमार्फत इतर योजनेअंतर्गत भांडवली अनुदानास पात्र उद्योग घटकांना संबधित योजनेचा लाभ अनुज्ञेय होईल परंतु एकत्रित भांडवली अनुदानाची रक्कम जास्तीत जास्त 50 टक्के पेक्षा जास्त अनुज्ञेय होणार नाही.

- **स्पर्धात्मकता वाढविणे**

  समुह विकास केंद्र काथ्यावर आधारित सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाच्या/उद्योगाच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास कार्यक्रमाच्या (MSI-CDP) अंतर्गत काथ्या उद्योगांची किमान 5 समुह विकास केंद्रे स्थापन करण्यास राज्य शासन प्रोत्साहन देईल. या योजनेअंतर्गत काथ्यावर आधारित सामूहिक सुविधा केंद्र उभारणी करण्याकरीता प्रकल्प खर्चाच्या 90% रक्कम अनुदान रुपाने सहाय्य म्हणून देण्यात येईल व याकरीता आवश्यक निधी उद्योग विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करण्यात येईल.

- काथ्या उद्योग उबवण (Incubation), संशोधन आणि विकास केंद्र

  महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या महाकॉयर, कुडाळ येथे काथ्या उद्योग उबवण, संशोधन आणि विकास केंद्र उभारण्यात येईल. आवश्यकतुेनसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्राधान्याने जागा/भूखंड उपलब्ध करुन देईल. या केंद्राच्या उभारणीसाठी व सबलीकरणाकरीता रु. 10 कोटीचा निधी देण्यात येईल.

- **कौशल्य व उद्योजकता विकास**

  काथ्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व सेंट्रल कॉयर रिसर्च इन्स्टिटयूट, अल्लपी, केरळ यांच्यामार्फत उद्योजकांच्या गरजानुसार अद्ययावत अभ्यासक्रम तयार केले जातील. या संस्थामार्फत उद्योजकता विकास, व्यवस्थापन, व्यावसायिक व तांत्रिक कौशल्याशी संबंधित विविध कार्यशाळा व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येईल. या प्रशिक्षणातील निवासी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रती प्रशिक्षणार्थी रु. 18,000/- व अनिवासी प्रशिक्षणार्थीसाठी प्रती प्रशिक्षणार्थी रु. 10,000/- एवढे प्रशिक्षण सहाय्य अनुज्ञेय करण्यात येईल.
  उद्योगासाठी लागणारे आर्थिक व तांत्रिक सहाय्य देण्यासाठी केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या योजनांचा समन्वय करण्यात येईल.

Government of Maharashtra

- **बाजारपेठ विकास व विपणन सहाय्य**
- **प्रदर्शनामध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहन**

  काथ्याच्या उत्पादनांसाठी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी, राज्यातील काथ्या उद्योजकांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रदर्शने व मेळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल. तसेच परदेशात भेटी आयोजित करणे, ग्राहक व विक्रेते यांच्या भेटी आयोजित करण्यासाठीच्या सहाय्य/सुविधा पुरविण्यात येतील. देशभरातील प्रदर्शनामध्ये सहभागी होण्यासाठी रु. 0.50 लक्ष किंवा प्रदर्शनातील गाळ्याच्या भाड्याच्या 75 टक्के रक्कमेच्या मर्यादेत (एका घटकास कमाल मर्यादा 25 हजार प्रती प्रदर्शन) व आंतराष्ट्रीय प्रदर्शनासाठी रु. 3 लक्ष एवढी सवलत देण्यात येईल.
- **प्रदर्शने आयोजित करणे**

  काथ्या व काथ्यावर आधारित उत्पादित वस्तूसाठी राष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करुन विक्रीस प्रोत्साहन देण्यासाठी, राज्यातील काथ्या उद्योजकांसाठी राज्यस्तरावर व राष्ट्रीय प्रदर्शने कमाल 5 दिवस कालावधीची आयोजित करण्यात येतील. अशा प्रकारची प्रदर्शने आयोजित करण्यासाठी राज्यस्तरीय अंमलबजावणी समितीच्या मान्यतेने वित्तीय सहाय्य देण्यात येईल.
- **शासकीय विभागांकडून काथ्या उत्पादनाच्या वापरास प्रोत्साहन**

  शासनाचे विभाग व कार्यालयांना काथ्याची उत्पादने वापरण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल. शासनाच्या कृषि व मृदसंधारण, सार्वजनिक बांधकाम, जलसंधारण इ. विभागांनी त्यांच्या कामामध्ये, भूस्त्र प्रावरण तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी निर्देशित करण्यात येईल. तसेच कृषि व वन विभागामध्ये वृक्ष लागवड, फलोत्पादन व रोपवाटीकांमध्ये कोकोपीथची खरेदी महाराष्ट्रातील उद्योजकांमार्फत करण्यासाठी राज्याच्या खरेदी धोरणात आवश्यक त्या तरतुदी करण्यात येतील.
- **प्रदर्शन/विक्री केंद्र स्थापित करणे**

  काथ्या व काथ्यावरील आधारित उत्पादनास राज्याध्ये बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत महाराष्ट्रातील 5 महत्वाच्या पर्यटन स्थळांमध्ये कायमस्वरुपी प्रदर्शन व विक्री केंद्रांची स्थापना राज्यस्तरीय अंमलबजावणी समितीच्या मान्यतेने करण्यात येईल. यासाठी रु. 5 कोटी एवढा निधी उपलब्ध करण्यात येईल.

## 7. राज्यस्तरीय अंमलबजावणी समिती

राज्य काथ्या धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी येणाऱ्या अडचणी व समस्यांचे निराकरण व धोरणाचे सनियंत्रण करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येईल.

1. विकास आयुक्त (उद्योग) अध्यक्ष
2. व्यवस्थापकीय संचालक (महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ) सदस्य सचिव
3. मुख्य कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ) सदस्य
4. सह आयुक्त (जी.एस.टी. विभाग) सदस्य
5. उद्योग सह संचालक (सु.ल.म.उ.) सदस्य

## 8. अंमलबजावणी यंत्रणा

सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत देण्यात येणारी विविध अनुदाने व प्रोत्साहने तसेच समूह विकास योजनेअतर्गत देय अनुदान याबाबतची अंमलबजावणी उद्योग संचालनालय, यांच्याकडून करण्यात येईल. तसेच विपणन सहाय्य, तांत्रिक कौशल्य व उद्योजकता विकास, उबवण (Incubation) व संशोधन विकास केंद्र योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडून करण्यात येईल.

## 9. धोरणाची वैधता

सदर धोरण घोषित केलेल्या दिनांकापासून 5 वर्षाच्या कालावधीसाठी किंवा त्यानंतर पुढील आदेशापर्यंत वैध राहील.

Government of Maharashtra

## DEPARTMENT OF INDUSTRIES, ENERGY AND LABOR

Government of Maharashtra,
Mantralaya, Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22025393
**Website: https://www.maharashtra.gov.in/**

## DIRECTORATE OF INDUSTRIES

Government of Maharashtra,
New Administrative Building,
2nd floor, Opp. Mantralaya,
Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22023584/22028616
**Website: https://di.maharashtra.gov.in/**

## MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION (MIDC)

Udyog Sarathi, Mahakali Caves Road,
Andheri East, Mumbai, Maharashtra 400093
Tel.: (91-22) 26870800
**Website: https://www.midcindia.org/**

## MAHARASHTRA INDUSTRY, TRADE AND INVESTMENT FACILITATION CELL (MAITRI)

"Krupanidhi" Building, 9,
Walchand Hirachand Marg,
Ballard Estate, Mumbai – 400001
Tel.: (91-22) 22622362
**Email id: maitri-mh@gov.in**
**Website: https://maitri.mahaonline.gov.in/**